# कवडसा

पूर्वी कौलारू घरं होती किंवा लोखंडी पत्र्यांचे छत असायचे. तसं घरात माफक उजेड असायचा, दिवसाही सूर्यप्रकाश मर्यादित काळासाठी कारण आजच्यासारख्या मोठ्या खिडक्या नसायच्या. त्यातही माजघर अथवा कोठीघर, अडगळीची खोली येथे तसा प्रकाश कमीच असायचा. ह्याच माजघरात, स्वयंपाकघरात कौलाच्या फटीतून अथवा पत्र्याच्या छिद्रातून सूर्याची कोवळी किरणं थेट छतापासून जमिनीपर्यंत शिरायची. छताच्या फटीतून सूर्याची ही कोवळी किरणं घरात शिरायची, तो प्रकाशाचा नाजूक झोत म्हणजे 'कवडसा'. तिरपे सूर्य किरण, घरात शिरताना त्या उजेडात धूलिकण खूप सुंदर तरंगताना दिसतात आणि कधी त्या सोनेरी रंगासोबत, इतर रंगांची उधळण करतात. हाच तो प्रकाशाचा 'कवडसा'. त्या अंधाऱ्या खोलीत तो कवडसा जणू नवचैतन्य निर्माण करतो.

कवडसा हा फक्त प्रकाशाचा नाजूक झोत नाही तर तिमिरातील आशेचा किरण शोभतो. कवडसा हा दिवसा, सूर्यप्रकाशात छान शोभतो तसा तो रात्रीच्या वेळी खिडकीतून चंद्रप्रकाशाच्या रूपात घरात डोकावतो आणि निळसर रंगाचा कवडसा शांत शीतल चंद्रप्रकाशाचा आभास निर्माण करतो. अंधारात जणू आशेचे किरण निर्माण करणारा हा प्रकाशाचा कवडसा. हा कवडसा आपली उत्तम साथसोबत करत असतो फक्त आपण रोजच्या धकाधकीच्या जीवनात त्याच्या सौंदर्याची दखल घेत नाही.

आधी घरं छान मातीची होती, त्यावर कौलारू छत. सकाळी उन्हाची कोवळी किरणं त्या छताच्या कपारीतून जमिनीवर पडताना, त्या उजेडात धुळी किरणांनी आच्छादलेला हा कवडसा, नवीन दिवसासोबत जणू आशेची किरणं घेऊन यायचा. जणू नवचैतन्य घेऊन यायचा. त्यात चूल पेटली असेल की त्या धुराच्या वलयात हा कवडसा जास्तच सुंदर दिसायचा. अजूनही एखादं खेडेगावातल्या स्वयंपाकघराचं छायाचित्र बघितलं की त्या चित्रात जास्त आकर्षक दिसतो, तो कवडसा.

सकाळच्या गुलाबी थंडीत, आसमंतात धुकं दाटलेलं असताना, सूर्याची कोवळी किरणं, झाडाच्या मागून, पानांच्या गर्दीतून वाट काढत जमिनीवर पोहोचतात, त्यावेळी हाच कवडसा त्या गुलाबी थंडीत, धुक्याच्या पार्श्वभूमीवर जणू वेगळेच सौंदर्य ओततो. त्या सूर्यकिरणाच्या कवडस्यात, त्या निसर्गाच्या कॅनव्हास वर सोनेरी रंग ओततात आणि त्या कॅनव्हासला नवीन तेज प्राप्त होते. जंगलातील उंच झाडांच्या सावलीच्या पार्श्वभूमीवर, सूर्य किरणांचा हा कवडसा त्या वातावरणाला नवे चैतन्य बहाल करतो.

कवडसा हा छान सोबती वाटतो. सभोवताली नैराश्येच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हा कवडसा जणू आशेचा किरण ठरतो, जणू सभोवताली अंधार दाटला असताना दिसणारा आशादायक प्रकाश. निराशेचे मळभ सभोवताली दाटले असताना आपले कोणीतरी आप्तजन जवळ यावे आणि त्यांच्या अस्तित्वाने

उभारी मिळावी तसा हा कवडसा भासतो, स्नेहाचा... मातेचा... सगळं जग विरोधात असताना, आपला जिवलग मित्र आपल्या सोबत राहावा, त्याची साथ सोबत मिळावी... ती मैत्रीतील निरागसता आणि विश्वास म्हणजेच कवडसा... चहूबाजुनी संकटे घोंगावत असताना, न बोलावता कोणी मदतीचा हात देतो, तो आधार हा जणू कवडसा... हा कवडसा कधी सकारात्मक विचारांचा असू शकतो, जेव्हा मनात जणू नकारात्मक विचारांचे काहूर माजलेले असते... त्यावेळी एक कवडसा सकारात्मक विचारांचा, positive mindset निर्माण करतो... कधीकधी ठरल्याप्रमाणे गोष्टी घडत नाहीत, प्रयत्नांना यश येत नाही त्यावेळी पुन्हा नवीन पद्धतीने आणि नवविचाराने जोमाने प्रयत्न करायला भाग पाडणारा, हा नवचैतन्याचा कवडसा, नवीन स्वप्नं, उद्दिष्ठे ह्यांची पाठराखण करतो.. रागावलेल्या मनाला, समजूतदारपणाचा कवडसा असतो... कधी कधी शारिरीक आणि मानसिक वेदनांवर सहानुभूतीची फुंकर, हा कवडसाच घालतो...

कवडसा हा ऊन सावलीचा खेळ... प्रकाश आहे आणि छाया आहे म्हणून कवडसे आहेत.. हा कवडसा सगळीकडे आपली सोबत करतो... छतातून नाजूक सूर्याच्या किरणात आणि धुळीकणात डोकावतो... तो आरशावर पडल्यावर परिवर्तित होतो... त्या कवडस्याकडे बघत राहावंसं वाटतं, एखाद्या अल्लड बालकप्रमाणे.. त्या कवडस्याच्या उजेडात तळहात धरला तर लालबुंद शरीरातील रक्त परिवर्तित होते जणू... लहानपणीचे ते क्षण आठवतात, भूतकाळात घेऊन जातात.. अंधाऱ्या कोठडीतल्या कैद्याला हाच कवडसा, आशेचा किरण भासतो... जणू दुःखाच्या प्रसंगात, सुखाचा शिडकावा भासावा तसा... गुरू ठाकूर ह्यांच्या ओळी आठवतात,

"सुख वेचिन म्हणण्या आधी
घन दुःखाचा गहिवरतो
अन दुःख सावरू जाता
'कवडसा' सुखाचा येतो"

दुर्दैवाने आता शहरीकरण झाले, लोक बंद फ्लॅट संस्कृतीत राहायला लागलेत.. दारं सदोदित बंद.. शेजारी कोण आहे त्याचा पत्ता नाही, जो तो आपपल्या कामात व्यस्त, कोणाची कोणाला विचारपूस नाही.. सभ्यता आणि आधुनिकता, पुढारलेपण ह्यांच्या बुरख्यात घराला ना फटी राहिल्यात ना काही बाहेरच्या निरागस कोवळ्या उन्हाचा शिरकाव.. आहे त्या फटी बुजवल्या जातात, सभ्यतेच्या नावाखाली..त्यामुळे हा स्नेहाचा, नात्याचा, विश्वासाचा कवडसा सहसा सापडत नाही. ह्या काँक्रिटच्या जंगलात आणि सभ्यतेच्या बुरख्यात ह्या निरागस भावनेच्या, मायेच्या ओलाव्याच्या कवडस्याला जणू जागाच उरली नाही.. मग हे प्रेमाचे, स्नेहाचे, मैत्रीचे आणि निरागसतेचे कवडसे शोधायला पुन्हा आपल्या मातीकडेच जावं लागेल... त्या हव्याहव्याशा कवडस्याच्या शोधात... मग हा कवडसा नैराश्येच्या गर्तेतून सहज बाहेर काढेल आपल्याला.. जसा अज्ञानातून ज्ञानाकडे प्रवास घडावा तसा..

हा कवडसा  अंधःकाराकडून प्रकाशाकडे नेणारा, "तमसो मा ज्योतिर्गमय" हे बोधवाक्य अधोरेखित करणारा... हा कवडसा दाखवतो, काळ्या अंधाराला ठेंगा, नवप्रकाशाने आणि नवचैतन्याने..

**- मनोज मोहन कुरुंभटी**